ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 7 | MARCH - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# देवदासी परंपरेपासून रंगमंचापर्यंत – भारतीय शास्त्रीय नृत्यातील स्त्रीचा प्रवास



डॉ. अमिता जावळे
ग्लोबल व्हिलेज आर्टस्,
सायन्स आणि कॉमर्स कॉलेज, बोरामणी, सोलापूर.

## सारांश:-

भारतीय शास्त्रीय नृत्य ही भारताच्या सांस्कृतिक परंपरेचा एक महत्त्वाचा आणि प्राचीन घटक आहे. या नृत्यपरंपरेत स्त्रियांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. प्राचीन काळी मंदिरांमध्ये देवदासी परंपरेच्या माध्यमातून माध्यमातून स्त्रिया धार्मिक आणि सांस्कृतिक विधींमध्ये नृत्य सादर करीत. देवदासी या देवतेला समर्पित केल्या जात आणि त्या मंदिरातील उत्सव, धार्मिक समारंभ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये नृत्य आणि संगीताच्या माध्यमातून सहभाग घेत. या परंपरेत त्यांना सामाजिक आणि धार्मिक प्रतिष्ठा प्राप्त झाली होती, परंतु त्यांचे वैयक्तिक स्वातंत्र्य मर्यादित होते कारण यांच्या जीवनावर धार्मिक संस्थांचे नियंत्रण होते.[1] ब्रिटिश कालखंडात भारतीय समाजातील अनेक पारंपरिक संस्थांवर प्रश्न उपस्थित केले गेले. त्यामुळे देवदासी परंपरेवरही याचा परिणाम झाला. वसाहतवादी प्रशासन आणि काही सामाजिक सुधारकांनी या परंपरेला अनैतिक मानून तिच्यावर कायदेशीर निर्बंध घातले. यामुळे मंदिरांमधील नृत्यपरंपरेचा ऱ्हास झाला आणि अनेक पारंपरिक नर्तक्यांचे सामाजिक व आर्थिक स्थान कमकुवत झाले.[2] २०व्या शतकात भारतीय सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीमुळे शास्त्रीय नृत्याला नव्याने महत्त्व प्राप्त झाले. रुक्मिणी देवी देवी अरंडेल, बालासरस्वती यांसारख्या कलाकारांनी पारंपरिक नृत्यशैलींचे पुनरुज्जीवन करून त्यांना आधुनिक रंगमंचावर सादर केले. या प्रक्रियेमुळे मंदिरांमधील नृत्य परंपरा ही रंगमंचीय शास्त्रीय कलेत परिवर्तित होण्यास मदत झाली.[3]

आज भारतीय शास्त्रीय नृत्य हे केवळ एक सांस्कृतिक वारसा नसून स्त्री सशक्तीकरणाचे एक प्रभावी माध्यम बनले आहे. स्त्रिया नृत्याच्या माध्यमातून केवळ कलात्मक अभिव्यक्तीच करत नाहीत, तर सामाजिक आणि सांस्कृतिक नेतृत्वही करतात. त्यामुळे देवदासी परंपरेपासून आधुनिक रंगमंचापर्यंतचा स्त्रीचा प्रवास हा भारतीय समाजातील सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रतीक मानावे लागेल.

## प्रस्तावना:

भारतीय शास्त्रीय नृत्य परंपरा ही भारतीय संस्कृतीच्या अत्यंत प्राचीन आणि समृद्ध वारसा आहे. नृत्य ही केवळ कलात्मक अभिव्यक्ती नसून ती भारतीय समाजाच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाशी घट्ट जोडलेली

नाळआहे. प्राचीन काळापासून मंदिरांमध्ये संगीत आणि नृत्याचा उपयोग धार्मिक विधी, उत्सव आणि सामाजिक समारंभांमध्ये केला जात होता. या परंपरेत स्त्रियांची भूमिका विशेष महत्त्वाची होती, कारण त्या नृत्य आणि संगीताच्या माध्यमातून धार्मिक भावना आणि सांस्कृतिक मूल्ये समाजापर्यंत पोहोचवत असत.[4]

नाट्यशास्त्र हा प्राचीन ग्रंथ भारतीय नृत्यपरंपरेचा शास्त्रीय आधार असून या ग्रंथात नृत्य, अभिनय, संगीत, रंगमंच रचना, पोशाख आणि हावभाव यांचे सविस्तर वर्णन आलेले आहे.या ग्रंथामुळे भारतीय नृत्यशैलींना एक शास्त्रीय चौकट प्राप्त झाली. या परंपरेत स्त्री नर्तकींची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली गेली आहे. मंदिरांमध्ये सादर होणारे नृत्य नृत्य केवळ मनोरंजनासाठी नसून ते धार्मिक अनुभवाचा आणि आध्यात्मिक साधनेचा एक भाग मानले जाते.[5] देवदासी परंपरेत स्त्रिया मंदिरांमध्ये समर्पित केल्या जात आणि त्या देवतेच्या सेवेसाठी नृत्य आणि संगीत सादर करत अशा मुलींना लहानपणसूनच त्याचे प्रशिक्षण दिले जात. त्यामुळे त्या अत्यंत कुशल कलाकार बनत. त्यामुळे या देवदाशी मंदिरातील सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग मानल्या जात. अशा देवदासिंचा उल्लेख अनेक ऐतिहासिक शिलालेख, साहित्यिक ग्रंथ आणि प्रवासी लेखनांमध्ये आढळतो, त्यातून या परंपरेचे सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट होते.[6] होते.[6]

तथापि, सामाजिक आणि राजकीय बदलांमुळे या परंपरेत कालांतराने अनेक बदल झाले. विशेषतः वसाहतवादी काळात देवदासी परंपरेवर तीव्र टीका होऊन तिच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. या प्रक्रियेमुळे मंदिरांमधील नृत्यपरंपरा हळूहळू कमकुवत झाली. परिणामी, भारतीय सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीमुळे शास्त्रीय नृत्याला नव्या महत्वाचे स्थान मिळाले.[7] स्वातंत्र्यानंतर अनेक महिला कलाकारांनी या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. आज भारतीय शास्त्रीय नृत्य केवळ सांस्कृतिक परंपरेचे प्रतिनिधित्व करत नाही, तर सामाजिक परिवर्तन आणि स्त्रीच्या सर्जनशील शक्तीचे प्रतीक म्हणूनही ओळखले जाते.[8]

## देवदासी परंपरा : ऐतिहासिक व सांस्कृतिक संदर्भ:

देवदासी परंपरा ही प्राचीन मंदिरसंस्कृतीशी संबंधित एक महत्त्वाची सामाजिक आणि सांस्कृतिक संस्था होती. 'देवदासी' या शब्दाचा अर्थ 'देवाला समर्पित स्त्री' असा होतो. या स्त्रिया मंदिरातील देवतेच्या सेवेसाठी समर्पित केल्या जात तसेच धार्मिक विधी, उत्सव व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये नृत्य आणि संगीत सादर करीत. मंदिरांतील या नृत्यपरंपरेचा संबंध धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक परंपरा आणि कलात्मक अभिव्यक्ती यांच्याशी घट्ट जोडलेला होता.[9] दक्षिण भारतातील चोल, पांड्य आणि विजयनगर साम्राज्यांच्या काळात मंदिरसंस्था अत्यंत समृद्ध होत्या त्यामुळे तया देवदासी मंदिरसंस्थेचा महत्त्वाचा भाग होत्या.[10] देवदासींना लहानपणापासूनच गुरु–शिष्य परंपरेतून शास्त्रीय नृत्यशैलींचे शिक्षण मिळत असे. या प्रशिक्षणामुळे त्या अत्यंत कुशल कलाकार बनून मंदिरातील सांस्कृतिक परंपरेचे संवर्धन करीत. भरतनाट्यम, ओडिसी, कथक यांसारख्या अनेक शास्त्रीय नृत्यप्रकारांच्या विकासात या देवदासींचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यांच्या नृत्यशैलीत भाव, हावभाव, मुद्रासंयोजन आणि कथानक सादरीकरण यांचा सखोल अभ्यास दिसून येतो.[11] सामाजिक दृष्टिकोनातून त्यांना पारंपरिक अर्थाने विवाह करण्याची परवानगी नसे, कारण त्या देवतेच्या सेवेसाठी समर्पित मानल्या जात. तथापि, काही समाजांमध्ये त्यांना आर्थिक स्वातंत्र्य आणि सांस्कृतिक प्रतिष्ठा प्राप्त होती. अनेक देवदासी शिक्षित, कलाप्रवीण आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम असत.[12] काळानुसार सामाजिक, राजकीय आणि आर्थिक बदलांमुळे देवदासी परंपरेचे स्वरूप बदलत गेले. काही ठिकाणी या परंपरेवर टीका होऊ लागली तसेच तिच्या सामाजिक परिणामांवर प्रश्न उपस्थित करण्यात आले. तरीही, देवदासींच्या माध्यमातून भारतीय शास्त्रीय नृत्य परंपरेचे जतन आणि संवर्धन मोठ्या प्रमाणात झाले. त्यांच्या कलात्मक कौशल्यामुळे नृत्य ही केवळ धार्मिक क्रिया न राहता सांस्कृतिक अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम बनली.[13] या पार्श्वभूमीवर देवदासी परंपरा ही भारतीय सांस्कृतिक

इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग मानली जाते. या परंपरेने भारतीय शास्त्रीय नृत्याला केवळ तांत्रिक आणि कलात्मक समृद्धीच दिली नाही, तर स्त्रियांच्या सांस्कृतिक सहभागाची एक वेगळी परंपराही निर्माण केली. त्यामुळे देवदासी परंपरेचा अभ्यास हा भारतीय नृत्यपरंपरेच्या इतिहासाचा अविभाज्य भाग मानला जातो.[14]

### वसाहतकालीन हस्तक्षेप व बदल:-

ब्रिटिशांच्या आगमनानंतर दक्षिण भारतातील देवदासी परंपरेत मोठे सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक बदल घडून आले कारण पाश्चात्य शिक्षणप्रणालीमुळे पूर्वी मंदिरसंस्कृतीचा एक मान्यताप्राप्त भाग असलेली ही देवदाशी परंपरा ब्रिटिश कालखंडात नैतिकतेच्या निकषांवर तपासली जाऊ लागली.[16]

ब्रिटिश प्रशासक आणि मिशनऱ्यांनी देवदासी परंपरेला अनैतिक व समाजासाठी अपायकारक मानून तिच्यावर टीका करण्यास सुरुवात केली. विशेषतः ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या लिखाणामध्ये देवदासी परंपरेचे चित्रण "धार्मिक वेश्याव्यवस्था" (religious prostitution) म्हणून करण्यात आले. या दृष्टिकोनामुळे भारतीय समाजातही या परंपरेबद्दल प्रश्न उपस्थित होऊ लागले.[17]

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २०व्या शतकाच्या प्रारंभी सामाजिक सुधारणा चळवळींनी या विषयाला अधिक महत्त्व दिले. स्त्रियांचे शिक्षण, सामाजिक प्रतिष्ठा आणि मानवी हक्क यांवर भर देणाऱ्या सुधारणावाद्यांनी देवदासी देवदासी व्यवस्थेवर कठोर टीका केली. काही सुधारकांनी ही व्यवस्था स्त्रियांच्या शोषणाचे साधन असल्याचे सांगितले, तर तर काहींनी तिचे सांस्कृतिक व कलात्मक पैलू अधोरेखित केले.[18] त्यामुळं या काळात दक्षिण भारतात देवदासी प्रथा बंद करण्यासाठी विविध सामाजिक आणि कायदेशीर चळवळी सुरू झाल्या. विशेषतः मद्रास प्रेसीडेन्सीमध्ये या विषयावर मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. अनेक महिला कार्यकर्त्यांनी आणि समाजसुधारकांनी देवदासींच्या पुनर्वसनासाठी आणि त्यांच्या अधिकारांसाठी आवाज उठवला.[19]

परिणामी २०व्या शतकाच्या सुरुवातीला देवदासी व्यवस्थेवर बंदी घालण्याच्या दिशेने कायदे करण्यात आले. Madras Devadasis (Prevention of Dedication) Act, 1947 हा या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. या कायद्याने कायद्याने मंदिरांना मुली अर्पण करण्याची प्रथा बेकायदेशीर ठरवली जाऊन देवदासी व्यवस्थेच्या अधिकृत समाप्तीची प्रक्रिया सुरू झाली.[20] त्यामुळे केवळ धार्मिक परंपरेतच नाही तर सांस्कृतिक क्षेत्रातही मोठे परिवर्तन झाले. देवदासी परंपरेशी संबंधित असलेली नृत्यकला मंदिरांच्या मर्यादेतून बाहेर पडून नव्या सामाजिक संदर्भात विकसित होऊ लागली.[21]

### शास्त्रीय नृत्याची पुनर्रचना:

ब्रिटिश काळात देवदासी परंपरेशी संबंधित असलेल्या नृत्यकलेचे पुनर्मूल्यांकन सुरू झाले. मंदिरांमध्ये सादर होणाऱ्या या नृत्यकलेला पूर्वी "सदिर" (Sadir) असे म्हटले जात होते. परंतु सामाजिक सुधारणा चळवळी आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या प्रक्रियेमुळे या नृत्यकलेला नव्या स्वरूपात सादर करण्याचा प्रयत्न सुरु झाला.[22] २०व्या शतकाच्या प्रारंभी काही सांस्कृतिक विचारवंतांनी या नृत्यकलेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी या कलेला धार्मिक व नैतिक दृष्ट्या स्वीकारार्ह बनवण्याचा प्रयत्न केला. या प्रक्रियेत नृत्याच्या सादरीकरणात काही बदल करून त्याला नव्या सांस्कृतिक चौकटीत बसवले.[23] या पुनर्रचनेत काही उच्चवर्णीय आणि सुशिक्षित महिलांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी या नृत्यकलेला मंदिरांपासून दूर नेऊन रंगमंचावर सादर करण्यास सुरुवात करून त्याला सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली , मात्र यामुळे देवदासी समुदायाची पारंपरिक भूमिका कमी होत गेली.[24]

याच नृत्यकलेला "भरतनाट्यम" हे नाव देण्यात आले आणि तिला भारतीय शास्त्रीय नृत्यप्रकार म्हणून मान्यता मिळाली. या प्रक्रियेमुळे भारतीय सांस्कृतिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून या कलेचे पुनरुज्जीवन झाले, झाले, परंतु देवदासी परंपरेशी असलेले तिचे ऐतिहासिक संबंध अनेकदा दुर्लक्षित राहिले.[25]

देवदासी परंपरेशी संबंधित असलेल्या नृत्यकलेचे आधुनिक काळात मोठ्या प्रमाणावर पुनर्मूल्यांकन झाले. विशेषतः भरतनाट्यमसारख्या शास्त्रीय नृत्यप्रकारांनी मंदिरांच्या मर्यादेतून बाहेर पडून आधुनिक रंगमंचावर स्थान मिळवले. या प्रक्रियेमुळे नृत्यकलेचा सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ बदलला. पूर्वी धार्मिक विधींचा भाग असलेली ही कला आता सांस्कृतिक वारशाचे प्रतीक म्हणून सादर केली जाऊ लागली.[26] आधुनिक काळात अनेक महिला कलाकारांनी भरतनाट्यम आणि इतर शास्त्रीय नृत्यप्रकारांद्वारे स्त्री सशक्तीकरणाचा संदेश दिला. त्यांनी आपल्या सादरीकरणामध्ये स्त्रियांच्या अनुभवांना, त्यांच्या संघर्षांना आणि सामाजिक प्रश्नांना अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे नृत्यकला नृत्यकला केवळ मनोरंजनाचे साधन न राहता सामाजिक जागृतीचे माध्यम बनली.[27] जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतीय शास्त्रीय नृत्यप्रकारांना आंतरराष्ट्रीय स्तरावरही मोठी मान्यता मिळाली. आज भरतनाट्यम, कुचिपुडी, कथक, ओडिशी, मोहिनीअट्टम यांसारखे नृत्यप्रकार जगातील विविध देशांमध्ये शिकवले आणि सादर केले जातात. या भारतीय सांस्कृतिक परंपरेचा प्रसार होऊन स्त्रियांच्या कलात्मक अभिव्यक्तीला नवे व्यासपीठ मिळाले आहे.[28]

तथापि, या प्रक्रियेत देवदासी परंपरेचा ऐतिहासिक संदर्भ विसरून चालणार नाही हेही तितकेच महत्त्वाचे आहे. कारण या नृत्यकलेच्या विकासात देवदासी समुदायाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे होते. त्यांच्या परंपरेमुळेच या कलेचा सांस्कृतिक आणि तांत्रिक पाया घातला गेला त्यामुळे आधुनिक काळात या परंपरेचा अभ्यास करताना तिच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संदर्भांचा विचार करणे आवश्यक ठरते.[29]

## निष्कर्ष:

देवदासी परंपरा ही भारतीय समाजाच्या सांस्कृतिक आणि धार्मिक इतिहासातील एक गुंतागुंतीची आणि बहुआयामी परंपरा आहे. सुरुवातीच्या काळात ही व्यवस्था मंदिरसंस्कृतीशी संबंधित असून देवपूजेचा एक भाग म्हणून अस्तित्वात होती. देवदासी स्त्रिया नृत्य, संगीत आणि धार्मिक विधी यांमध्ये पारंगत होत्या आणि मंदिरसंस्थांमध्ये त्यांना विशिष्ट सामाजिक स्थान प्राप्त होते. परंतु कालांतराने सामाजिक, आर्थिक आणि राजकीय बदलांमुळे या परंपरेचे स्वरूप बदलत गेले. विशेषतः ब्रिटिश सत्तेच्या हस्तक्षेपामुळे आणि सामाजिक सुधारणा चळवळींच्या प्रभावामुळे देवदासी व्यवस्थेवर कठोर टीका झाली आणि अखेरीस त्यावर कायदेशीर बंदी घालण्यात आली. या प्रक्रियेमुळे देवदासी परंपरेचा संस्थात्मक अंत झाला, परंतु तिच्याशी संबंधित असलेली नृत्यकला नव्या स्वरूपात विकसित झाली.

भरतनाट्यमसारख्या शास्त्रीय नृत्यप्रकारांच्या पुनरुज्जीवनामुळे भारतीय सांस्कृतिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग जतन झाला. तथापि, या पुनर्रचनेच्या प्रक्रियेत देवदासी समुदायाची ऐतिहासिक भूमिका अनेकदा दुर्लक्षित राहिली. त्यामुळे इतिहासाच्या अभ्यासात या परंपरेचा सखोल आणि संतुलित दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक आहे. आजच्या काळात देवदासी परंपरेचा अभ्यास केवळ ऐतिहासिक किंवा सांस्कृतिक दृष्टीनेच नव्हे तर स्त्री-अध्ययनाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा ठरतो. कारण या परंपरेत स्त्रियांच्या सामाजिक स्थान, सांस्कृतिक योगदान आणि त्यांच्या संघर्षांचा संघर्षांचा इतिहास दडलेला आहे. त्यामुळे देवदासी परंपरेचा अभ्यास भारतीय समाजाच्या व्यापक इतिहासाला समजून घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो.

## संदर्भ ग्रंथ सूची


१. सास्किया सी. केरसेनबूम, नित्यसुमंगली : देवदासी ट्रॅडिशन इन साउथ इंडिया, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली, १९८७, पृ. १२.
२. कित्ता , पृ. २८.
३. लक्ष्मी विश्वनाथन, वुमन ऑफ प्राईड : द देवदासी हेरिटेज, रोली बुक्स, नवी दिल्ली, २००८, पृ. ४१.
४. अमृत श्रीनिवासन, "रिफॉर्म अँड रिव्हायव्हल : द देवदासी अँड हर डान्स, इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली, खंड २०, अंक ४४, १९८५, पृ. १८६९.
५. सास्किया सी. केरसेनबूम, नित्यसुमंगली,उपरोक्त, पृ. ३५.
६. लक्ष्मी विश्वनाथन, उपरोक्त, पृ. ५२.
७. अमृत श्रीनिवासन, उपरोक्त, पृ. १८७०.
८. डेव्हेश सोनेजी, अनफिनिश्ड जेस्चर्स : देवदासीस, मेमरी अँड मॉडर्निटी इन साउथ इंडिया, युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो प्रेस, २०१२, पृ. ३१.
९. सास्किया सी. केरसेनबूम, नित्यसुमंगली, उपरोक्त, पृ. ४८.
१०. लक्ष्मी विश्वनाथन, उपरोक्त, पृ. ६०.
११. डेव्हेश सोनेजी, उपरोक्त , पृ. ४५.
१२. अमृत श्रीनिवासन, उपरोक्त, पृ. १८७१.
१३. सास्किया सी. केरसेनबूम, नित्यसुमंगली, उपरोक्त, पृ. ७४.
१४. लक्ष्मी विश्वनाथन, उपरोक्त, पृ. ६८.
१५. डेव्हेश सोनेजी, उपरोक्त, पृ. ५२.
१६. अमृत श्रीनिवासन, उपरोक्त, पृ. १८७०.
१७. सास्किया सी. केरसेनबूम, उपरोक्त, पृ. १०२.
१८. डेव्हेश सोनेजी, उपरोक्त , पृ. ५४.
१९. लक्ष्मी विश्वनाथन, उपरोक्त, पृ. ७६.
२०. मद्रास देवदासी (प्रिव्हेन्शन ऑफ डेडिकेशन) अॅक्ट, १९४७.
२१. अमृत श्रीनिवासन, उपरोक्त, पृ. १८७३.
२२. कापिला वात्स्यायन, इंडियन क्लासिकल डान्स, पब्लिकेशन्स डिव्हिजन, नवी दिल्ली, १९९२, पृ. ६८.
२३. अवंती मेदुरी, "भरतनाट्यम : व्हॉट आर यू?", एशियन थिएटर जर्नल, खंड ५, अंक १, १९८८, पृ. ५.
२४. डेव्हेश सोनेजी, उपरोक्त, पृ. ८८.
२५. कापिला वात्स्यायन, उपरोक्त,पृ. ७२.
२६. कापिला वात्स्यायन, उपरोक्त, पृ. ९५.
२७. अवंती मेदुरी, उपरोक्त, पृ. १२.
२८. जेनेट ओ' शेआ, अॅट होम इन द वर्ल्ड : भरतनाट्यम ऑन द ग्लोबल स्टेज, वेस्लीयन युनिव्हर्सिटी प्रेस, २००७, पृ. ४५.
२९. डेव्हेश सोनेजी, उपरोक्त, पृ. १२०.
३०. जेनेट ओ' शेआ, उपरोक्त, पृ. ३०.